नाशिक, दिनांक :- ०२/१२/२०११

प्रेस नोट

पोलीस आयुक्त नाशिक शहर आस्थापनेवरील पोलीस भरती-२०११ प्रक्रिया सुरु असून उमेदवारांची लेखी परिक्षा दि.१०/१२/२०११ रोजी सकाळी ०७.०० वा. पोलीस कवायत मैदान येथे घेण्यात येणार आहे. कागदपत्र, मैदानी चाचणीत अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांच्या नावांच्या याद्या पोलीस कवायत मैदान, नाशिक शहर येथे दि.०८/१२/२०११ रोजी लावण्यात येतील. उमेदवारांनी लेखी परिक्षेसाठी खालील नमुद सुचनांचे पालन करावे.

१) उमेदवारांनी लेखी परिक्षेसाठी दि.१०/१२/२०११ रोजी सकाळी ०७.०० वा.पोलीस कवायत मैदान, नाशिक शहर सी.बी.एस.जवळ येथे उपस्थित रहावे.

२) उमेदवारांनी लेखी परिक्षेसाठी येतांना काळा बॉलपेन व चिमटा असलेले पॅड सोबत आणावे.

३) उमेदवारांनी परिक्षेस येतांना मोबाईल फोन, ब्ल्युटूथ, हेडसेट, कॅल्क्युलेटर तसेच कोणत्याही प्रकारची वहया, पुस्तके, नोटस् इ. सोबत आणू नयेत.

४) उमेदवारांनी लेखी परिक्षेसाठी येतांना प्रवेश पत्र (हॉल टिकीट) सोबत आणणे अनिवार्य आहे. प्रवेशपत्राशिवाय उमेदवारांना लेखी परिक्षेसाठी प्रवेश दिला जाणार नाही.

2.12

(साहेबराव पाटील)
पोलीस उपआयुक्त (परिमंडळ-१)
तथा अध्यक्ष, भरती समिती नाशिक शहर

2.12.11

प्रति,

सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे)

२/- सदरची प्रेस नोट प्रचलित वर्तमानपत्र / स्थानिक दुरदर्शन चॅनेल / आकाशवाणी इ. प्रसारमाध्यमांमार्फत प्रसिध्द करण्यात यावी तसेच ओएसी सेंटर / नाशिक पोलीस वेबसाईट इ.वर प्रदर्शित करण्यात यावी.

प्रत :- जिल्हा माहिती अधिकारी, नाशिक.

प्रत: पो० नि० संगणक कक्ष

API कबाडी